# प्रकरण तिसरे

# प्रकरण तिसरे

# रवींद्र शोभणेंच्या कथेमधील पात्रांचे परस्परसंबंध

प्रस्तावना -

दुसऱ्या प्रकरणात आपण शोभणेंच्या ' वर्तमान ' आणि ' शहामृग ' या दोन कथासंग्रहातील कथांच्या आशयसूत्रांचा विचार केला. या प्रकरणात वरील कथासंग्रहातील कथेतील पात्रांचे परस्परसंबंध पाहणार आहोत.

कथेतील व्यक्ती चित्रणाला अतिशय महत्व असते. कारण कोणतीही घटना ही कथेतील व्यक्तिच्या जीवनाभोवतीच निर्माण झालेली असते व व्यक्तिच्या कथेतील शब्दरूप प्रतिमेलाच ' पात्र ' म्हटले जाते आणि पात्रांचे स्वभावदर्शन हा कथेचा गाभा असतो. पात्रांचे व्यक्तिचित्रण हे कथानक, घटना, वातावरण या सर्वांशी संबंधीत असते. ही जी पात्रे कथेमध्ये आलेली असतात. त्यांच्यातील परस्पर संबंधातून अनेक गोष्टी स्पष्ट होतात. म्हणून प्रस्तुत प्रकरणात शोभणे यांच्या कथांमधील पात्रांचे संबंध तपासून बघावयाचे आहे.

शोभणेंच्या पात्रांचे असणारे परस्पर संबंध त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये, तसेच व्यक्तिंच्या असणाऱ्या वेगवेगळ्या प्रवृत्ती याचा अभ्यास पुढील घटकांच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

१. राजकीय क्षेत्रातील पात्रांचे परस्पर संबंध.

२. स्त्री-पुरूष यांच्यातील परस्पर संबंध.

३. वृत्तपत्रीय जगतातील पात्रांचे परस्पर संबंध.

४. सुधारणावादी पात्रांचे परस्पर संबंध.

## १. राजकीय क्षेत्रातील पात्रांचे परस्पर संबंध :-

' वर्तमान ' या कथासंग्रहातील ' पायरीचा दगड ', ' जल्लोश ', ' तेथे लव्हाळे राहती ', या कथातून व ' शहामृग ' या कथासंग्रहातील ' खेळीया ' या राजकीय आशयाच्या कथेतून राजकीय क्षेत्रातील पात्रांचे परस्पर संबंध आलेले आहेत.

' पायरीचा दगड ' या कथेत एकूण चार पात्रे आलेली आहेत. यामध्ये बाळासाहेब-सुधीर, भाऊ-सुधीर-मृदुला यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

### बाळासाहेब-सुधीर :-

बाळासाहेब सुधीरची शिंपी समाजासमोर व समाजसेवी संघटनेचे महासचिव वामनरावांसमोर भावी समाजसुधारक म्हणून ओळख करून देतात. कारण सुधीरचा निवडणुकीच्या वेळी वापर करून घ्यायचा असतो. त्यातून बाळासाहेबांची चलाखी समजून येते. सुधीर शिंपी समाजासाठी प्रारंभी प्रामाणिकपणे कार्य करत असतो. पण यातून आपणास फायदा होतो आहे हे लक्षात येताच सुधीर बदलतो. तो आपल्या समाजाच्या हितापेक्षा स्वत:चे हित महत्वाचे मानतो. यावरून त्याचा स्वार्थीपणा दिसून येतो. सुधीरने शिंपी समाजाचा विश्वास संपादन केल्यानंतर बाळासाहेब सुधीरला नोकरी देवू करतात. पण त्या बदल्यात शिंपी समाजाची मते मिळवून देण्याची अट ठेवतात. सुधीर सुध्दा याच संधीची वाट पहात असतो. त्यामुळे तो बाळासाहेबांची अट मान्य करतो. यावरून बाळासाहेब डाव खेळणारे वाटतात. तर सुधीरने संधीचा सदुपयोग करून घेतलेला दिसतो. तसेच दोघांनीही स्वत:च्या स्वार्थासाठी मुखवटे धारण केलेले आहेत हे स्पष्ट होते.

बाळासाहेब सुधीरला मृदुलाशी लग्न करायला भाग पाडतात. त्यावरून बाळासाहेब व सुधीर मध्ये तणाव निर्माण झालेला दिसतो. मृदुलाला सुधीरपासून दिवस गेलेले असतात व लग्न हाच एक पर्याय असतो. म्हणून बाळासाहेब सुधीरशी तडजोड करायला तयार होतात. तर सुधीरने मृदुलाशी लग्न केले नाही तर त्याला नोकरी पासून मुकावे लागेल. म्हणून सुधीरही बाळासाहेबांबरोबर तडजोड करायला तयार होतो. यातून दोघांची वेळ पडल्यास तडजोड करण्याची वृत्ती दिसून येते. शोभणेंनी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

बाळासाहेब व सुधीर यांच्या परस्पर संबंधातून त्यांचा स्वार्थीपणा, एकमेकांच्यावर कुरघोडी करण्याची प्रवृत्ती याचे चित्रण केले आहे. तसेच त्यांचे परस्परसंबंध कधी सरळ, जिव्हाळ्याचे तर कधी ताणतणावाचे चित्रित केले आहेत. एक कार्यकर्ता आणि त्यांचा नेता यांच्यातील रूढ संबंधापेक्षा हे संबंध वेगळ्या स्वरूपात लेखकाने केले आहेत.

## भाऊ-सुधीर -

भाऊंचा सुधीर हा मोठा मुलगा असतो. सुधीर शिकून नोकरीला लागेल आणि आपली व आपल्या घरची परिस्थिती सुधारेल. म्हणून भाऊंनी सुधीरला कष्ट करून एम. कॉमचे शिक्षण दिलेले असते. पण सुधीर नोकरी करायची सोडून समाजकार्य करत बसला आहे असे वाटते. म्हणून भाऊ म्हणतात. '' सुधीर नौकरीपान्याचं सोडून कायले ह्या फालतू फंदात पल्ला रे पोरा ? आपल्या सारख्या मान्साइंच हे काम नोह्य.''[१] ('वर्तमान' पृ.८) यातून भाऊंचा अपेक्षा दिसतात व भाबडेपणाही दिसून येतो. पण सुधीर भाऊंना समजावतो, की समाजकार्य करताना मोठ्या लोकांच्या ओळखी होतील व त्यांच्या ओळखीने नोकरीही मिळवता येईल. यातून सुधीरचे वडील साधे, सरळ विचार करणारे, भाबडेपणाने वागणारे दिसतात. सुधीरवर त्यांचे प्रेम आहे, त्याच्या कामाचे कौतुकही त्यांना वाटते, पण सुधीर अडचणीत येईल का अशी त्यांना काळजीही वाटते. तसेच सुधीरला जबाबदारीची जाणीव आहे. असेही दिसते. सुधीर-भाऊ परस्परसंबंध शोभणेंनी स्वाभाविक असेच दाखवलेले आहेत. बाप आणि मुलगा यांच्यात जसे जवळीकतेचे, परस्पर प्रेमभावाचे संबंध असतात तसे चित्रण येथे लेखकाने केले आहे.

## सुधीर-मृदुला :-

सुधीर मृदुलाची ओळख बाळासाहेबाच्या निवडणुकीच्या कामानिमित्त होते. दोघे सतत एकमेकाच्या सहवासात असतात. त्यामुळे त्यांच्यामनात प्रेम भावना निर्माण होतात व ते स्वाभाविक असते. पण त्यांना मर्यादा पाळता येत नाहीत. त्यामुळे मृदुलाला सुधीर पासून दिवस जातात व सुधीरने मृदुलाशी लग्न करणे हाच एक एक पर्याय असतो. म्हणून बाळासाहेब सुधीरला मृदुलाशी लग्न करण्यास

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

धमकी देतात. मृदुलाला मात्र सर्व परिस्थितीला आपणही जबाबदार आहोत याची जाणीव असते. म्हणून ती सुधीरला भेटते व म्हणते, " माझ्यामुळं तुम्हांला त्रास होतो आहे. मी आत्महत्या केली असती, पण त्यांनतर मात्र तुम्हालाच त्याचा अधिक त्रास होईल."[२] ('वर्तमान' पृ.२०) मृदुला चांगल्या मनाने लग्नाला तयार होते. पण सुधीर मात्र फक्त स्वार्थ पाहून व नाईलाजाने लग्नाला तयार होतो. यातून मृदुलाने सुधीरवर असलेले प्रेम, तिचा भोळा स्वभाव दिसून येतो. तर सुधीरने मृदुलाचा प्रत्येक वेळी फायदा उठवलेला दिसतो आणि स्वार्थीपणा दिसून येतो.

सुधीर व मृदुलाच्या परस्परसंबंधातील प्रेम आणि त्याबरोबर निर्माण झालेला तणाव दिसून येतो. नेहमीच प्रेम नि:स्वार्थी, त्यागी असेच दाखवले जाते. पण सुधीरसारखा स्वार्थी माणूस आपल्या स्वार्थापुढे प्रेमभावना नगण्य मानतो. परस्परावर प्रेम करणाऱ्या सुधीर व मृदुला यांच्यातील परस्परसंबंध रूढ स्वरूपातील नाहीत. सुधीर व्यवहारी आहे तर मृदुला भावनिक पातळीवर जगणारी आहे. हे विजोड जोडप्यातील प्रेम या कथेत येते. पण हे समाजातील वास्तव असण्याचही शक्यता आहे. म्हणून सुधीर व मृदुला यांच्यातील परस्परसंबंध स्वाभाविक वाटतात.

'जल्लोश' या कथेत एकूण चार पात्रे आलेली आहेत. त्यामध्ये प्रभू - प्राचार्य, प्रभू-प्रा. काशीकर, प्रभू-आई आणि वडील यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

## प्रभू - प्राचार्य :-

प्रभू हा कॉलेजच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून भाग घेतो. त्याचा निवडणुकीतील भ्रष्टाचार थांबवणे हा उद्देश असतो. पण प्राचार्यानी त्याला मनाई केलेली असते. कारण प्रभू हा हुशार मुलगा असतो व त्याचे निवडणुकीमुळे नुकसान होऊ नये असे प्राचार्यांना वाटते. तसेच प्राचार्यांना कॉलेजमधील निवडणुकीत होणाऱ्या भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करणे भाग पडत असते. कारण कॉलेजच्या संस्थापकाचा मुलगा निवडणुकीत भाग घेत असतो आणि त्यानेच निवडून यावे असा संस्थापकाचा दबाव असतो. म्हणून प्राचार्य प्रभूला निवडणुकीतून बाहेर पडण्यास सांगतात. यातून प्रभू विषयी प्राचार्यांना वाटणारी आपुलकी दिसून येते. पण प्रभू प्राचार्यांचे काही ऐकत नाही. उलट प्रभूच्या मनातील प्राचार्यांविषयीची आदराची भावना कमी होते.

मतदान झाल्यानंतर मत मोजनीला सुरूवात होते. त्यावेळी संस्थापकाच्या मुलाच्या पॅनेलचा मुलगा घोटाळा करायचा प्रयत्न करतो.. तेव्हा प्राचार्यांनी त्याला शिक्षा करावी अशी प्रभूची व इतर उमेदवारांची इच्छा असते. पण प्राचार्य तो मुलगा संस्थापकाच्या मुलाच्या पॅनेलचा आहे म्हणून दुर्लक्ष करतात. प्रभू प्राचार्यांना झालेल्या गोष्टीसाठी जबाबदार धरून संप करण्याचे ठरवतो. प्रभूच्या याच आतताईपणामुळे प्राचार्यांच्या व त्याच्या संबंधात तणाव निर्माण होतो. प्रभूला सर्व विद्यार्थ्यांचा पाठिंबा असतो. त्यामुळे प्रभू संप मागे घ्यायला प्राचार्यांना नकार देतो. इकडे प्राचार्यही निवडणुकीचा निकाल जाहीर करतात. त्यात संस्थापकाचा मुलगा एका मताने निवडून येतो. प्रभूला आपली हार पचवणे कठीण जाते. कारण त्याच्या तत्वांचीही हार झालेली असते. त्यामुळे तो खचला जातो. पण ज्यावेळी प्रभूला कॉलेजमधून वाईट वर्तणुकीचा आरोप ठेवून काढले जाते. त्यावेळी तो पूर्ण उद्ध्वस्त झालेला दिसतो. म्हणूनच तो कॉलेज समोर उभे राहून प्राचार्यांना शिवीगाळ करतो, दगडफेक करतो. प्रभूची ढासळलेली मानसिकता दिसून येते. प्राचार्यांना मात्र प्रभूला पोलिसांच्या ताब्यात देण्याशिवाय पर्याय राहत नाही.

प्रभू आणि प्राचार्य यांच्या परस्परसंबंधातून भ्रष्ट व्यवहाराच्या विरोधात लढू पाहणारा प्रभू आणि केवळ संस्थाचालकांच्या दबावामुळे लाचार झालेले प्राचार्य याचे चित्रण शोभण्यांनी या कथेत केले आहे. बदलत्या काळात महाविद्यालयाचे प्राचार्य आणि विद्यार्थी यांच्यातील परस्परसंबंध कसे बदलू लागले आहेत याचे दर्शन या कथेत घडते. एकेकाळी विद्यार्थ्यांसमोर प्राचार्य ही व्यक्ती आदर्श म्हणून असायची. विद्यार्थ्यांच्या मनात प्राचार्यांविषयी आदरयुक्त भिती असायची. हे सर्व कसे बदलत चालले आहे. याचे चित्रण शोभणे या कथेत करतातच पण त्याच्याबरोबर प्राचार्य आणि विद्यार्थी यांच्यातील बदलत्या नातेसंबंधाचेही चित्रण करतात.

## प्रभू आणि काशीकर :-

प्रा. काशीकर हे महाविद्यालयातील एक नामवंत प्राध्यापक आहेत. महाविद्यालयीन निवडणुकीत ते निवडणुक अधिकारी म्हणून काम करीत असतात. प्राचार्य जेव्हा निवडणुकीतून माघार घेण्याचा सल्ला देतात. तेव्हा प्रभू प्रा. काशीकरांकडे जाऊन ही गोष्ट सांगतो. प्रा. काशीकरही प्रभूला

प्राचार्यांनी दिला तसाच सल्ला देतात, '' मि. मोवाडकर, तुमचा हितचिंतक म्हणून मीही तुम्हाला असाच सल्ला देईन की तुम्ही या फंदात पडू नये.''[३] ('वर्तमान' पृ.११७) यावरून प्रा. काशीकर प्रभू विषयी आपुलकी असलेली दिसते व प्रभूलाही प्रा. काशीकरांविषयी आदर विश्वास असलेला दिसतो. पण प्रभू विद्यार्थ्यांच्या पाठिंब्यामुळे प्रा. काशीकरांचे ऐकत नाही. निवडणुकीत सहभागी ज्यावेळी प्रभू संप करतो व संप मागे घेण्यासाठी त्याला मुदत दिली जाते. त्यावेळी प्रा. काशीकर प्रभूला बोलवतात व संप मागे घेण्याचा सल्ला देतात. कारण त्यांना निवडणुकीत होणाऱ्या भ्रष्टाचाराची जाणीव असते व त्यात प्रभू सारख्या हुशार मुलाचे नुकसान होऊ नये असे वाटते. पण प्रभू त्यावेळीही त्यांचे ऐकत नाही.

प्रभू आणि प्रा. काशीकर यांच्या परस्परसंबंधातून असे दिसून येते की प्रा. काशीकर समंजस आहेत. विद्यार्थ्यांना समजून सांगण्याचा ते प्रयत्न करतात. ते नेहमी विद्यार्थ्यांच्या हिताची काळजी घेतात. आपल्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांना आत्मियता वाटते. या सर्व गोष्टी बघता प्रा. काशीकर संयमी, समंजस, कर्तव्यदक्ष, विद्यार्थीप्रिय असलेले दिसतात. प्रभू हट्टाला पेटलेला असतो. त्यामुळे तो कुणाचेही ऐकत नाही. प्रा. काशीकर मात्र प्रभूला समजून घेण्याचा प्रयत्न करतात. प्रभू आणि प्रा. काशीकर या गुरूशिष्यांच्या नात्यातील परस्परसंबंध अत्यंत स्वाभाविक स्वरूपात लेखकाने चित्रित केले आहेत.

## प्रभू-आई आणि वडील :-

प्रभूला शिकवून मोठे करायची स्वप्ने आई-वडिलांनी पाहिलेली असतात. त्यामुळे प्रभू कॉलेजच्या निवडणुकीत उभा आहे. हे प्रभूच्या आई-वडिलांना आवडत नाही. म्हणून प्रभूला तिची आई समजावण्याचा प्रयत्न करते. ती म्हणते, '' कॉलेजच्या निवडणुका अशा कोणत्या चांगल्या उद्देशातून लढवल्या जातात ? शेवटी ताडीच्या झाडाखाली बसून दूध पिलं, तरीही लोक दारू पिल्याचाच आरोप करतील. त्यापेक्षा चांगला अभ्यास कर, अभ्यासात नाव मिळव.''[४] ('वर्तमान' पृ.१२२) इतके सांगूनही प्रभू हट्टी स्वभावामुळे ऐकत नाही. प्रभूचे वडील सुध्दा प्रभूवर चिडतात. कारण त्यांना कॉलेजच्या निवडणुकीचे वातावरण माहीत असते. पण प्रभू त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतो आणि निवडणुकीत सहभागी होतो. निवडणुकीच्या दरम्यान बऱ्याच घडामोडी होतात व

निवडणुकीत झालेल्या कारवाईत वाईट वर्तणुक दाखवून प्रभूला कॉलेज मधून काढले जाते व तसे पत्र घरी पाठवले जाते. ते पाहून प्रभूच्या आईवडिलांना धक्का बसतो. त्यांना प्रभूच्या भविष्याबद्दल चिंता वाटू लागते. वडील प्रभूला खूप बोलतात पण प्रभूची आई प्रभूला परत समजावते व प्राचार्यांची माफी मागायला सांगते.

प्रभू आणि आईवडिलांच्या परस्पर संबंधातून असे दिसून येते की कुटुंबामध्ये मुलगा चुका करत असेल तर वडील रागावतात व आई समजावून सांगण्याचा प्रयत्न करते. कारण नेहमीच मुलगा आईचे ऐकत असतो असेच कुटुंबातील चित्रण लेखकाने येथे केले आहे. प्रभूला वडील रागवत असतात तर प्रत्येक वेळी आई प्रभूला समजावून सांगत असते. पण हट्टी स्वभावाचा प्रभू ऐकत नसतो. त्यामुळे प्रभू व आईवडिलांमधील संबंधात तणाव निर्माण झालेला दिसतो. प्रभूने आई वडिलांचे न ऐकल्यामुळे सगळ्यांनाच मनस्ताप झालेला दिसतो आणि प्रभूचे भविष्य धोक्यात आलेले दिसते. यांच्यातील परस्पर संबंध नेहमी सारखे दिसत नसले तरी ते स्वाभाविक वाटतात. तसेच प्रभू आणि आई वडिलांच्या परस्परसंबंधातून आई वडिलांना प्रभूविषयी वाटणारी काळजी, त्यांचा व्यवहारी दृष्टिकोण, त्यांना झालेला मानसिक त्रास व प्रभूचा हट्टीपणा ही स्वभाव वैशिष्ट्ये लेखकाने चित्रित केली आहेत.

‘ तेथ लव्हाळे राहती ’ या कथेत एकूण चार पात्रे दिसून येतात. यामध्ये सुदामदादा- धैर्यधर, सुदामदादा- गोदाकाकू, सुदामदादा- शीला यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

## सुदामदादा- धैर्यधर :-

धैर्यधर आणि सुदामदादा ही या कथेतील महत्त्वाची पात्रे आहेत. सुदामदादा गांधीवादी विचाराचे, तत्वनिष्ठ प्रवृत्तीचे असतात. धैर्यधर तरूण धडपड्या होतकरू असतो. सुदामदादा त्याने गुरू मानलेले असते. सुदामदादांमुळेच धैर्यधरला राजकीय प्रतिष्ठा प्राप्त होते. विधानपरिषदेवर त्याची नियुक्ती होते. राजकीय क्षेत्रात यश मिळाल्यानंतर मात्र धैर्यधर बदलतो. तो अधिकाधिक भ्रष्ट वागू लागतो. अनैतिक वाटावे असे वागू लागतो. शीला जुनघरेला फसवतो. त्यामुळे सुदामदादांचे स्वप्न भंग पावते. धैर्यधर इतका बदलल्याचे पाहून त्यांना वाईट वाटते ते धैर्यधरला म्हणतात, “ काय, रे भडव्यांनो .... तुम्ही सगळी नीतिमत्ता बाजारात विकली का ? काही लाजा ? कुठल्या अध:पतनाला

जाणार आहात तुम्ही ? धैर्यधरा, यानंतर राजकीय गुरू म्हणून चुकूनही माझं नाव सांगू नकोस काय ? अरे .... माझ्या संस्कारांचा थोडा तरी अंश उरला आहे का तुझ्यात ?''[५] ('वर्तमान' पृ.१४३) इतके बोलून सुदामदादा गप्प बसत नाहीत. ते धैर्यधरचा भ्रष्ट व्यवहार समाजासमोर यावा यासाठी प्रयत्न करू लागतात. आपल्या आत्मचरित्रात साऱ्या गोष्टी ते स्पष्टपणे लिहितात. धैर्यधर आणि सुदामदादा यांच्यात आधी असणारे जवळकीचे, प्रेमाचे, जिव्हाळ्याचे संबंध बिघडतात. ते एकमेकांचा सूड घ्यायला सज्ज होतात. धैर्यधर धुरंधर राजकारणी झालेला असतो; सुदामदादांचे तोंड बंद करण्याचा प्रयत्न धैर्यधर करू लागतो. त्यांच्या मुलाला नोकरी लावणे, त्यांच्या घरातील अन्य लोकांना विविधप्रकारची मदत करणे आणि त्यांची सहानुभूती प्राप्त करण्याचा प्रयत्न तो करीत राहतो. अशा तऱ्हेने गुरूशिष्याचे नाते असणारे हे दोघे आता एकमेकांचे शत्रू होतात. सुदामदादा आणि धैर्यधर यांच्यातील आधीच जवळकीचे आणि नंतरचे ताणतणावाचे परस्परसंबंध लेखकाने परिणामकारक स्वरूपात चित्रित केले आहेत. राजकीय क्षेत्रात शिरल्यानंतर माणसाचे माणूसपण कसे नष्ट होते, धैर्यधरसारखा प्रामाणिक माणूस किती भ्रष्ट होतो याचे चित्रण तर लेखकाने केले आहेच. त्याचबरोबर सुदामदादांसारखा तत्त्वनिष्ठ गांधीवादी माणूस आपल्या तत्त्वाशी कसा प्रामाणिक असतो. याचेही चित्रण येथे येते. राजकीय क्षेत्रातील तत्त्वांची मोडतोड व्यक्त करीत असतानाच राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या दोन पिढ्यांमधील फरकही लेखकाने येथे व्यक्त केला आहे.

### सुदामदादा - गोदाकाकू :-

सुदामदादा स्वातंत्र्य सैनिक असतात सुदामदादा गांधीवादी विचारसरणीचे व तत्त्वनिष्ठा जपणारे असतात. म्हणून लग्नानंतरही ते पाच वर्षे चळवळीत भाग घेत राहतात. त्यामुळे सुदामदादांचे संसाराकडे आपोआपच दुर्लक्ष झालेले असते. गोदाकाकू मात्र पतिनिष्ठेने संसार करीत असतात. त्या नवऱ्यासाठी खादी सुध्दा वापरायला लागतात. गोदाकाकूंची ही पतिनिष्ठा, त्यांनी केलेला त्याग सुदामदादांना जाणवत असतो. त्यामुळे ते स्वत:ला यासाठी अपराधी मानत असतात. पण ज्यावेळी स्वातंत्र्यासाठी इतके झटूनही सुदामदादांना एकही राजकीय पद मिळत नाही. त्यावेळी सुदामदादा व

गोदाकाकू यांच्यात मतभेद निर्माण होतात व या मतभेदामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो व शेवटी सुदामदादा एकाकी होतात.

सुदामदादा व गोदाकाकू यांच्या परस्परसंबंधातून स्वातंत्र्य सैनिक झालेले पती व त्यांच्या पत्नी यांच्यात जसे पती-पत्नी म्हणून संबंध असतं तसेच संबंध शोभणेंनी येथे चित्रित केले आहेत. नवरा स्वातंत्र्य सैनिक आहे म्हणून बायका भारावून संसार करायला तयार होत्या. पण वास्तवता लक्षात आल्यानंतर नवरा-बायको मध्ये मतभेद होत असे याचेच चित्रण सुदामदादा व गोदाकाकू यांच्या परस्परसंबंधातून आलेले दिसते. तसेच गोदाकाकूंची पतिनिष्ठा, त्यागी वृत्ती व सुदामदादांची नि:स्वार्थी देशभक्ती तत्त्वनिष्ठा आणि समजूतदारपणा अशी स्वभाव वैशिष्ट्ये लेखकाने चित्रित केली आहेत.

## सुदामदादा-शीला :-

शीला धैर्यधराच्या संस्थेत शिक्षिका म्हणून काम करत असते. शीलाला धैर्यधराने लग्नाचे वचन देवून फसवलेले असते. शीला न्याय मागण्यासाठी सुदामदादांकडे जाते. कारण सुदामदादा व धैर्यधर मध्ये गुरूशिष्याचे नाते असते. पण सुदामदादांना शीलाचीच वर्तणुक वाईट वाटते. त्यावेळी शीला म्हणते, “ दादा, स्वखुशीनं कुणी आपलं आयुष्य असं नासवतं का ? चारचौघीसारखा सुखाचा संसार करावा, असं कुणाला वाटत नाही ? पण त्यांच्या हातांत इथल्या शिक्षणव्यवस्थेचे लगाम आहेत, ते आम्हांला कितपत सुखानं जगू देतात ? अनिच्छेनं, मन मारून आम्हांला सगळं सहन करावं लागतं. सहन केलं नाही, त्यांची मर्जी सांभाळली नाही, तर नोकरीला मुकावं लागतं. पुन्हा पायपीट करावी लागते आणि दुसऱ्या ठिकाणीही किती सुरक्षितता असते ?”[६] (‘वर्तमान’ पृ.१४२) यावरून शीला फसवली गेली आहे हे सुदामदादांच्या लक्षात येते व धैर्यधरही किती नीतीभ्रष्ट झाला आहे ते समजून येते. पण धैर्यधरने शीलाशी लग्न करावे असे सुदामदादांना वाटते. म्हणून ते धैर्यधरशी भांडतात. पण धैर्यधर धुरंधर राजकारणी असतो. तो परस्पर शीला जुनघरेचा मृत्यू घडवून आणतो व शीलाने आत्महत्या केली आहे असे दर्शवतो. मात्र सुदामदादांना शीलाचा खून झाला आहे हे लक्षात येते. शीलाचे सुदामदादांशी कोणतेही रक्ताचे नाते नसते. पण माणुकीच्या नात्याने सुदामदादा व शीला बांधले गेलेले

असतात. म्हणून सुदामदादा शीलावर झालेला अन्याय सहन करू शकत नाहीत. ते सर्वोतोपरीने शीलाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात.

शीला व सुदामदादा यांच्यात परस्परसंबंधातून असे दिसून येते की त्यांच्यात रक्ताचे नाते नसले तरी वडील आणि मुलगा यांच्यात ज्याप्रमाणे आपलेपणाचे, जिव्हाळ्याचे संबंध असतात. तसेच लेखकाने येथे चित्रित केले आहेत. असे चित्र समाजात अपवादात्मक जरी दिसत असले तरी ते वास्तव वाटते. तसेच सुदामदादांची अन्यायाविषयी असलेली चीड, लढण्याची जिद्द, शीलाचा भोळेपणा प्रामाणिकपणा ही स्वभाववैशिष्ट्येही यातून चित्रित होतात.

' खेळीया ' या कथेत एकूण चार पात्रे दिसून येतात. त्यामध्ये मालविका - विमल, मालविका-शेखर, माईसाहेब- शिरूभाऊ यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

**मालविका- विमल :-**

विमल ही मालविकाची आई आहे. मालविकाचे वडील वारले आहेत. मालविका व विमल मध्ये सुरवातीला काहीच सुसंवाद होत नाही. कारण मालविकाच्या जीवनातील सर्व निर्णय तिचे आजोबा नानसाहेब घेत असतात. पण नानासाहेबांच्या मृत्यूनंतर विमल व मालविका मध्ये सुसंवाद घडून येतो व मालविका आणि विमल मध्ये जवळीकता निर्माण होते. मालविकाला आपली आई विमलने केलेला त्याग समजून येतो. विमलची झालेली कुचंबणा तिने कशी सहन केली हे लक्षात येते व आपणही आईकडे दुर्लक्ष केले याची खंत मालविकाला वाटते. पण विमलला मात्र मालविकाची काळजी वाटत असते. कारण मालविका राजकारणातील सत्ता संघर्षात उतरलेली असते व राजकारणातील सर्व चढउतार विमलने जवळून पाहिलेले असतात. म्हणून मालविकाने सत्ता संघर्षात न पडता नवऱ्याकडे परत जावे असेच तिला वाटते. पण मालविकावर राजकीय सत्तेचा वारसदार म्हणूनच संस्कार झालेले असतात. त्यामुळे मालविका सत्तेतून बाहेर पडण्यास नकार देते.

मालविका व विमल यांच्यातील परस्परसंबंध आई आणि मुलीचे ज्याप्रमाणे संबंध असतात त्याप्रमाणे लेखकाने चित्रित केले आहेत. विमलला मालविकाविषयी वाटणारी काळजी, तिच्या सुखाचा

केलेला विचार आणि तिला राजकीय जीवनापासून परावृत्त करण्याचा केलेला प्रयत्न यातून आई व मुलगीमध्ये जसे जवळीकतेचे प्रेमाचे, जिव्हाळ्याचे संबंध असतात. तसेच शोभणेंनी चित्रित केलेले दिसून येतात व हे परस्परसंबंध स्वाभाविक असेच वाटतात.

## मालविका - शेखर :-

मालविकाने शेखर पासून घटस्पोट घेतलेला असतो. तरीही मालविका व शेखर मध्ये प्रेम टिकून असते. तसे दोघांच्या मध्ये कोणतेही भांडण नसते. फक्त मालविका राजकीय सत्तेत यायची प्रबळ इच्छा असते व शेखरला मात्र या क्षेत्रात यायचे नसते. म्हणून नानासाहेबांच्या पुढाकाराने मालविका शेखर पासून घटस्पोट घेतलेला असतो. नानासहेबांच्या मृत्यूनंतर शेखर मालविकाला भेटायला येतो. त्यावेळीही शेखरला वाटते की मालविकाने राजकीय चक्रव्यूहात अडकू नये. पण मालविकाच्या मनात सत्तेची लालसा उत्पन्न झालेली असते. त्यामुळे ती यातून बाहेर पडण्यास तयार होत नाही. ती शेखरला अधिकार भावनने सांगते, " हे बघ, मी या चक्रव्यूहात प्रवेश करण्याचं ठरवलचं आहे. ते एकादाच होऊनच जाऊ दे. नानासाहेब असते तर हा व्यूह तयारच झाला नसता. बघू काय होतंय ते आणि एक लक्षात ठेव. मला तुझी गरज भासलीच तर मी बिनदिक्कतपणे येईन. तुझ्या कुशीत शिरूर सगळा कढ रिता करीन."[७] ('शहामृग' पृ.१३८, ३९)

यातून शेखर आणि मालविका मध्ये सुरवातीला पती पत्नी मध्ये ज्याप्रमाणे संबंध असतात त्याप्रमाणे प्रेमाचे, जवळिकतेचे, विश्वासाचे संबंध असलेले दिसतात. मधल्या काळात मात त्यांच्यात दुरावा निर्माण झालेला दिसतो. पण तो दुरावा टिकून न राहता परत त्यांच्यात जवळिकतेचे, प्रेमाचे आपलेपणाचे, विश्वासाचे संबंध निर्माण झालेले दिसतात व हे नाते संबंध लेखकाने परिणामकारकपणे चित्रित केले आहेत. असे अपवादात्मक घडत असले तरी अस्वाभाविक वाटत नाही.

## माईसाहेब - शिरूभाऊ :-

शिरूभाऊ व माईसाहेब यांच्यात भाऊ बहिणीचे नाते असते. पण नानासाहेबांच्या मृत्यूनंतर मात्र त्यांच्यात सत्तेसाठी संघर्ष सुरू झालेला दिसतो व सत्तेत पुढे येण्यासाठी एकमेकांच्यावर आरोप

केलेले दिसतात. एकमेकांचा अपमान केलेला दिसतो, माईसाहेबांनी मात्र या संघर्षात राजकीय डावपेच अधिक खेळलेली दिसून येतात. त्या शिरूभाऊंच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले जातील अशा भानगडी छापून आणतात व शिरूभाऊंना जीवे मारण्याचाही प्रयत्न करतात. पण शिरूभाऊ मात्र माईसाहेबांच्या विरूध्द काहीच करू शकत नाहीत. फक्त ते झालेल्या प्रकाराने चिडून माईसाहेबांची कारस्थाने घरातील सर्वांसमोर बोलून दाखवतात व नंतर हताश होऊन रडू लागतात.

माईसाहेब व शिरूभाऊ यांच्या परस्परसंबंधातून भाऊबहिणीसारखे संबंध दाखवलेले नसून त्यांच्यात निर्माण झालेली सत्तेची लालसा द्वेषाची भावना, सूड प्रवृत्ती, तणाव शोभणेंनी येथे चित्रित केला आहे. तसेच त्यातून माईसाहेबांची हुशारी, कपटी वृत्ती, खल प्रवृत्ती, तर शिरूभाऊंचा लाचारीपणा, हताशपणा ही स्वभाववैशिष्ट्ये चित्रित केली आहेत.

सारांश, राजकीय क्षेत्रातील पात्रांचे परस्परसंबंध पहात असताना ' पायरीचा दगड ', 'जल्लोश', 'तेथ लव्हाळे राहती ','खेळीया' या कथेतील पात्रांमधील परस्परसंबंध पाहिले. तसेच त्यातून अनेक स्वभाववैशिष्ट्ये आलेली पाहिली. त्यात सुधीर व बाळासाहेबांचा स्वार्थीपणा, कुरघोडी करण्याची प्रवृत्ती, भाऊंचा साधा सरळ विचार करण्याचा भाबडेपणा, मृदुलाचा भोळेपणा, प्रभूचा हट्टीपणा, जिद्दीपणा तर प्राचार्यांचा स्वार्थीपणा व प्रा. काशीकरांचा समंजसपणा, सुदामदादांची नैतिकतेसाठी लढण्याची वृत्ती तर धैर्यधरची नीतीभ्रष्टता, शीलाचा भोळेपणा, प्रामाणिकपणा, विमलची साधी सरळ वागण्याची सवय तर मालविकाची सत्तेची लालसा व सत्तेत पुढे येण्याची जिद्द तर शेखरचा प्रेमळपणा, माईसाहेबांची खल प्रवृत्ती तर शिरूभाऊंची द्वेषाची भावना व हताशपणा अशा प्रत्येक व्यक्ती मध्ये वेगवेगळ्या भावना, वृत्ती, प्रवृत्ती आणि स्वभाव दिसून येतात. तसेच प्रत्येक पात्रांच्या परस्परसंबंधातून वेगळेपण जाणवते. काही पात्रांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध दिसून येतात. तर काही संबंधामध्ये द्वेषाची भावना असलेली दिसते व काही संबंधामध्ये लढा असलेला दिसतो. तर काही संबंध परस्परविरोधी भूमिकेतून लढताना दिसतात. अशा अनेक पात्रांच्या परस्परसंबंधातून शोभणेंनी परस्पर विरोधी स्वभावाच्या व्यक्तिरेखांची निर्मिती केलेली दिसते या व्यक्तिरेखांमुळे कथानकाला एकप्रकारे

जिवंतपणा आणलेला दिसतो. राजकीय जीवनात असलेला संघर्ष, खेळी, स्वार्थ, भ्रष्टाचार, कुरघोडी ही सर्व वैशिष्ट्ये पात्रांच्या परस्परसंबंधातून चित्रित केलेली आहेत.

## २. स्त्री-पुरूष यांच्यातील परस्परसंबंध :-

' वर्तमान ', या कथासंग्रहातील ' न सापडलेले उत्तर ', ' आपुले मरण ', ' इस शहर में हर शख्स. . . ' या कथातून व ' शहामृग ' या कथासंग्रहातील ' महाप्रस्थान ', ' शहामृग ' या कथेतून स्त्री-पुरूष यांच्यातील परस्परसंबंध आलेले आहेत.

' न सापडलेले उत्तर ' या कथेत एकूण तीन पात्रे आलेली आहेत. त्यामध्ये प्रभा-शैला, प्रभा-लीना यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

प्रभा-शैला :-

शैला ही प्रभाच्या नवऱ्याच्या मित्राची व्यंकटेशची बायको असते. प्रभाचा नवरा श्रीधर जिवंत असे पर्यंत शैलाची संबंध चांगले असतात. परंतु श्रीधरच्या मृत्यूनंतर प्रभाचा व्यंकटेशशी कोर्टकचेरी करताना संबंध येतो. त्यामुळे शैला प्रभावर संशय घेवू लागते व प्रभा आणि शैलामधील संबंधामध्ये तणाव निर्माण होतो. शैलाला मूल होत नसल्यामुळे व्यंकटेश प्रभाबरोबर लग्न करण्यास तयार होतो. मात्र शैला प्रभालाच दोषी ठरवून तिला स्वत:च्या दु:खाविषयी सांगायला जाते त्यावेळी प्रभा म्हणते, "शैला, दोन स्त्रियांना एकमेकांसमोर उभं केलं, तर कोण जास्त दु:खी, हे ठरवताच येणार नाही."[८] ('वर्तमान' पृ.५३,५४) यावरून प्रभाही शैला इतकीच दु:खी असते हे समजते. पण प्रभा विचारी असते. म्हणून ती व्यंकटेशला लग्न करण्यास नकार देते.

यातून शैला व प्रभा मधील परस्परसंबंध सुरवातीला चांगले असलेले दिसतात. पण नंतर मात्र त्यांच्यात तणाव निर्माण झालेला दिसतो. शैला व प्रभाच्या स्वभावामध्ये विरोधाभास दिसून येतो. शैला उग्र स्वार्थी वृत्तीची तर प्रभा त्यागी व नि:स्वार्थी स्वभावाची ही स्वभाववैशिष्ट्ये लेखकाने परिणामकारकतेने चित्रित केलेली दिसतात.

## प्रभा - लीना :-

प्रभा आणि लीनाचे आई-मुलगी प्रमाणेच नाते असते व लीना दहावीत असल्यामुळे ती प्रभाशी समजुतदारपणे वागत असते. पण प्रभा जेव्हा व्यंकटेशशी लग्न करण्याचे ठरवते तेव्हा लीनाचे वागणे बदलते. लीनाला आपल्या आईने दुसरे लग्न करावे हे मान्य नसते. तिला असुरक्षितता जाणवू लागते. म्हणूनच ती प्रभाला म्हणते, " आई प्लीज तू आम्हाला सोडून जाऊ नकोस. आम्हांला पोरकं करू नकोस ग, आई. मी तूझ्या पाया पडते."[१] ('वर्तमान' पृ.५१) लीनाचे मन कोणत्या विचार चक्रात सापडले आाहे ते प्रभाला समजते व प्रभा अस्वस्थ होते. लीनामुळे तिच्या चिंतेत आणखी भर पडते. तिला लीनाची काळजी वाटू लागते. त्यामुळे प्रभावर मानसिक दडपण येते.

यातून लीना आणि प्रभा मध्ये असलेले परस्परसंबंध हे आई आणि मुलीमध्ये नेहमीचे जसे संबंध असतात तसे संबंध येथे लेखकाने चित्रित केलेले नाहीत. सुरवातीला लीना व प्रभा मध्ये जवळीकता दिसून येते. पण नंतर त्यांच्यात दुावा निर्माण झालेला दिसतो. त्यांच्यात तणाव निर्माण झालेला दिसतो. तसेच लीनाची असुरक्षितता, मानसिक स्थिती व प्रभाला वाटणारी काळजी, अस्वस्थ अवस्था, मानसिक ताण इ. स्वभाववैशिष्ट्येही त्यातून शोभणेंनी चित्रित केलेली आहेत.

' आपुले मरण ' या कथेत एकूण चार पात्रे आलेली आहेत. यामध्ये वसंतराव मिसेस जाधव, वसंतराव-भावना, राजू-वसंतराव आणि भावना यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

## वसंतराव-मिसेस जाधव :-

वसंतराव व मिसेस जाधव मध्ये मिस्टर जाधव मुळे ओळख होते. वसंतराव व मिसेस जाधव यांच्यात साहित्य हा आवडीचा विषय असल्यामुळे त्यांच्यात मैत्री निर्माण होते. त्यांची मैत्री बौध्दिक पातळीवरची असल्यामुळे मिस्टर जाधवांचा विरोध नसतो. पण समाज स्त्री-पुरूष मैत्री मान्य करत नाही. त्यामुळे या मैत्री पडसाद वसंतरावांच्या वैवाहिक जीवनावर पडतात. वसंतरावांच्या वैवाहिक जीवनामध्ये तणाव निर्माण होतो. अशा वेळी मिसेस जाधव वसंतरावांना भावनिक आधार देत असतात. पण या मैत्रीमुळे वसंतरावांना नोकरीतील बढती दिली जात नाही. त्यावेळी मात्र वसंतरावांचे व त्यांच्या

पत्नीचे जोरात भांडण होते. त्यावेळी वसंतराव मिसेस जाधव कडे जातात. तिथे त्यांना आपल्या भावनांना आवर घालता येत नाही आणि मिसेस जाधव त्यांना दिलासा देण्यासाठी जवळ जातात व दोघांच्या शारीरिक जवळिकतेमुळे मर्यादेला तडा जातो. दहा वर्षापासून टिकून असलेली वसंतराव आणि मिसेस जाधव मधील मैत्री तुटते. मिसेस जाधवचे आपल्या पतीवर प्रेम असते. त्यामुळे त्यांना ही मैत्री तोडणे भाग पडते. पण शेवटी वसंतरावांना एकाकी व एकटे व्हावे लागते.

यातून वसंतराव व मिसेस जाधव यांच्यातील परस्परसंबंध सुरवातीला मैत्रीचे, निष्ठेचे, विश्वासाचे असलेले दिसून येतात व त्यांची मैत्री बौध्दीक व भावनिक पातळीवरची असलेली दिसते. नंतर मात्र त्यांच्यातील मैत्रीला तडा गेलेला दिसतो. त्यामुळे त्यांच्यात तणाव निर्माण होऊन दूरावा आलेला दिसतो. स्त्री-पुरूषामधील मैत्री समाज मान्य करत नाही. तरी सुध्दा त्यांच्यातील मैत्रीचे नातेसंबंध स्वाभाविक वाटतात. तसेच त्यातून वसंतरावांची मैत्रीवरील निष्ठा, सहनशील वृत्ती, स्वाभिमान, हळवेपणा व मिसेस जाधवचा समजूतदारपणा, व्यवहारीपणा इ. स्वभाव वैशिष्ट्येही शोभणे परिणामकारकतेने चित्रित करतात.

### वसंतराव - भावना :-

वसंतराव व भावना मध्ये पती पत्नीचे नाते असते व त्यांचे एकमेकांवर प्रेमही असते. म्हणूनच वसंतराव आपला पहिला कविता संग्रह भावनाला अर्पण करतात. पण त्यांच्यातील हे प्रेम टिकून रहात नाही. वसंतरावांची मैत्री मिसेस जाधव ब्ररोबर होते व त्यांची मैत्री बौध्दिक व भावनिक पातळीवरची असते. तरी पण भावनाचा वसंतरावांचा मैत्रीला विरोध असतो. कारण कोणत्याही पत्नीला आपल्या पतीचे दुसऱ्या स्त्रीशी मैत्रीचे जरी संबंध असले तरी ते आवडत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात सतत भांडणे होऊ लागतात व त्यांचे वैवाहिक जीवन विस्कळीत होते. त्यांना स्वत:च्या मुलाला वसतिगृहात ठेवणे भाग पडते. घरात सतत भांडणे वाद त्यामुळे अशांती निर्माण होते. प्रेमाने बोलणारी भावना वसंतरावांशी उध्दटपणे बोलू लागते. वसंतरावांचा बाहेरच्या लोकांसमोर अपमान करू लागते व हे सर्व वसंतराव सहन करत असतात. पण ते मैत्री सोडण्यास नसतात आणि भावना वसंतरावाना समजून घेण्यास तयार नसते. त्यांच्यात एक दरी निर्माण झालेली दिसते.

वसंतराव व भावना यांच्यातील परस्परसंबंध हे नेहमीचे पतीपत्नीचे संबंध असतात तसे लेखकाने येथे चित्रित केलेले नाहीत. वसंतराव व भावनामध्ये निर्माण झालेल्या तणावाचे चित्रण यात आलेले आहे. वैवाहिक जीवन हे पती पत्नीमधील विश्वासावर व तडजोडीवर टिकून असते. पण येथे भावनाचा वसंतरावांवर विश्वास राहिलेला नसतो व वसंतरावांची तडजोड करण्याची तयारी नसते. त्यामुळे त्यांचे वैवाहिक जीवन विस्कळीत झालेले दिसते. याचेच चित्रण शोभणेंनी येथे केले आहे. तसेच भावनाची संशयी, हेकेखोर वृत्ती, आक्रमक स्वभाव व वसंतरावांची संयमी वृत्ती, समंजसपणा आणि मानसिक स्थिती ही स्वभाववैशिष्ट्ये परस्परसंबंधातून अचूकपणे शोभणेंनी टिपली आहेत.

## राजू-वसंतराव आणि भावना :-

राजू हा वसंतराव आणि भावनाचा मुलगा असतो. त्यांनी शिक्षणाच्या निमित्ताने राजूला वसतिगृहात ठेवलेले असते. पण राजूला वसतिगृहात ठेवण्याचे खरे कारण वेगळे असते. वसंतराव व भावना मध्ये होत असलेल्या भांडणाचा परिणाम राजूवर होऊ नये असे त्यांना वाटते. मात्र त्यांच्यातील भांडणाचे पडसाद उमटायचे रहात नाहीत. राजू सुट्टीवर आल्यानंतर वसंतराव व भावना मध्ये कडाक्याचे भांडण होते ते पाहून राजू अस्वस्थ होतो. आपला संताप तो दुधाची बाटली फोडून व्यक्त करतो आणि कायमचे घर सोडून जाण्याची धमकी देतो. त्यावेळी वसंतराव आणि भावना एकमेकाच्या चूका राजूला दाखवून देवू लागतात. राजू त्यांना फक्त घरातील भांडणे बाहेर न आणण्यास सांगतो आणि वसतिगृहात निघून जातो.

यातून राजू व आईवडिलांच्या परस्परसंबंधातून तणावाचे चित्रण शोभणेंनी केलेले आहे. वसंतराव व भावनाच्या भांडणामुळे राजूची मनस्थिती बिघडलेली दिसते व त्यांच्यात दूरावा निर्माण झालेला दिसतो. त्याचप्रमाणे वयोमानापेक्षा राजू अधिक व्यवहारी वाटतो. तर वसंतराव आणि भावना स्वार्थी व आक्रमक झालेली दिसतात. लेखकाने येथे मुलगा व आईवडील मधील परस्परसंबंध नेहमीसारखे न दाखवता त्यांच्यातील तणावाचे चित्रण परिणामकारकतेने दिसते.

'इस शहर में हर शख्स. . .' या कथेत एकूण तीन पात्रे आलेली आहेत. त्यामध्ये भाईजी-सुशीला, सुशीला-विभा यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

## भाईजी - सुशीला :-

भाईजी व सुशीला गायनाच्या कलेमुळे जवळ येतात. व सुशीला भाईजींच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित होते आणि घरदार सोडून, सर्व नात्यातील बंधने तोडून लग्न न करता भाईजींबरोबर रहायला लागते. समाजामध्ये असल्या नातेसंबंधाना वाईट समजले जाते. त्यामुळे सुशीला व भाईजींना समाजाच्या वाईट दृष्टिला तोंड द्यावे लागते. तरी पण सुशीला वयाची समाजाची पर्वा न करता सर्व मानसिक त्रास सहन करून निष्ठेने भाईजींबरोबर रहात असते. भाईजींना सुशीलाला होणाऱ्या मानसिक त्रासाची जाणीव असते. पण भाईजींच्या मुलीने त्यांना आत्महत्येची धमकी दिलेली असते. त्यामुळे ते सुशीलाशी मनात असूनही लग्न करू शकत नहीत. म्हणून सुशीलाला निदान घराचा आधार असावा. यासाठी ते रहाते घर तिच्या नावावर करणार असतात. पण सुशीलाच्या दुर्भाग्याने त्याच रात्री ते निधन पावतात व सुशीला मात्र त्यामुळे एकाकी, एकटी होते.

भाईजी व सुशीला यांच्या परस्परसंबंधातून लेखकाने नि:स्वार्थी प्रेम व निष्ठा याचे चित्रण केले आहे. नेहमीप्रमाणे दोन समवयीन युगलातील आकर्षणातून निर्माण झालेल्या प्रेमाचे चित्रण येथे आलेले नाही. तर भाईजी व सुशीला यांच्या प्रेमातून असे चित्रित होते की, प्रेमाला वयाची श्रीमंतीची अट नसते. कोणत्याही स्थितीत फुलते. प्रेमाला कारुण्याची झालर असली तरी निष्ठेवर टिकून राहते. याचेच चित्रण शोभणेंनी नेमकेपणाने केलेले दिसून येते. असे अपवादात्मक जरी घडत असले तरी ते वास्तववादी वाटते.

## सुशीला-विभा -

सुशीला आणि विभा आधी मैत्रीणी असतात. नंतर विभा सुशीलाची कट्टर शत्रू बनते. सुशीलाला विभा आपले वडील भाईजींबरोबर लग्न करू देत नाही. त्यामुळे सुशीलाला भाईजींबरोबर लग्न न करता रहावे लागते. मानसिक त्रास सहन करावा लागतो. विभा सुशीलाचा सतत अपमान करते. तिला रखेल म्हणून हिणवते. तेही सुशीला सहन करते. भाईजींच्या मृत्यूनंतर तर सुशीलाला घरी येण्यात विभा बंदी घालते व ज्यावेळी भाईजींच्या तेराव्याला कावळा शिवत नाही त्यावेळी सुशीलाला बोलवणे

पाठवते. सुशीला स्वाभीमानी असल्यामुळे जात नाही. सुशीलाला विभाने आधिक त्रास द्यायचे ठरवलेलेच दिसते. म्हणूनच सुशीलाने मागीतलेल्या भाईजींच्या रेकॉर्ड प्लेट विभा पाऊन किंमतीत ग्रंथालयाला देवून टाकते व सुशीलाकडून रहाते घर घेण्यासाठी नोटीस पाठवते. सुशीला मात्र आढेवेढे न घेता घर सोडायला तयार होते.

सुशीला आणि विभा मधील परस्परसंबंध सुरवातीपासून ते शेवटपर्यंत तणावाचेच लेखकाने चित्रिण केलेले आहेत. त्यात विभाची सुशीला विषयी असलेली चीड व त्यामुळे विभाने सुशीलाला शत्रू प्रमाणे दिलेली वागणूक याचे चित्रण येते. तसेच विभाचा हेकेखोर स्वभाव स्वार्थी व अहंकारी वृत्ती, सूड घेण्याची प्रवृत्ती व सुशीलाचा समंजस स्वभाव, सहनशील वृत्ती ही स्वभाववैशिष्ट्ये त्यातून दिसून येतात.

' महाप्रस्थान ' या कथेत एकूण चार पात्रे आलेली आहेत. त्यामध्ये सदानंद-नलिनी, श्रीधर-नलिनी, सदानंद-मुरलीधर यांच्यातील परस्पर संबंधाचे चित्रण आलेले आहे.

## सदानंद - नलिनी :-

सदानंद नलिनीची ओळख श्रीधरच्या मृत्यूमुळे होते. सदानंद श्रीधरचा भाऊ असल्यामुळे अंत्यविधीला तो आलेला असतो. त्यावेळी सदानंदला नलिनीकडून ती श्रीधरची प्रेयसी असल्याचे समजते आणि त्यांचे दहा वर्षापासून संबंध असल्याचेही समजते. प्रथम सदानंद या गोष्टीवर विश्वास ठेवत नाही. नंतर नलिनीचे वागणे बघून हळूहळू विश्वास बसू लागतो. नलिनी श्रीधरच्या वाईट वागणुकीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न करते व श्रीधरच्या मालमत्तेतील वाटा घेण्यासाठी नकार देते आणि सदानंद जायला निघतो तेव्हा म्हणते की, " तुम्हा सगळ्यांकडून प्रेम, तुमची माया, तुमचा जिव्हाळा माझ्यावर भले-बुरे आरोप ठेवून मला तुमच्यापासून - श्रीधरपासून तोडू नका."[१०] ('शहामृग' पृ.३६) हे ऐकूण नलिनीचे श्रीधरवर असलेले प्रेम व तिची निष्ठा समजते व सदानंदाच्या मनात नलिनीविषयी आदर वाटतो.

यातून नलिनीने केलेला त्याग, तिची प्रेमावर असलेली निष्ठा, श्रीधरवर असलेले नि:स्वार्थी प्रेम तसेच सदानंदाला नलिनीविषयी वाटणारी आपुलकीची भावना, आदराची भावना आणि माणुसकीच्या नात्याने असणारी सहानुभूती याचेच चित्रण लेखकाने त्यांच्या परस्परासंबंधातून केले आहे.

## श्रीधर-नलिनी :-

नलिनी आणि श्रीधर एकमेकांवर प्रेम करत असतात. श्रीधर लेखक असतो व नलिनी प्राध्यापिका असते. श्रीधरच्या लिखाणावर चर्चा केल्यामुळे नलिनीच्या मनातील लिखाणाबद्दल असलेले मतभेद नाहीसे होतात आणि त्यांच्यातील भेटी वाढत जावून त्यांच्यात भावना निर्माण होतात. दहा वर्षे त्यांच्यातील हे संबंध टिकून असतात. या दहा वर्षात श्रीधर कधीच नलिनीला लग्नाविषयी विचारत नाही. कारण श्रीधर स्वच्छंद जीवन जगणारी आत्मकेंद्री व्यक्ती असते व नलिनीचे श्रीधरवर प्रेम असते आणि तिने वयाची तिशी ओलांडलेली असते. म्हणून नलिनीलाही लग्न बंधनाची गरज भासत नाही. त्यामुळे त्यांच्यातील संबंध लग्न न करताही शारीरिक संबंध ठेवण्यापर्यंत गेलेले असतात. शेवटी श्रीधर दहा वर्षांनी हृदयविकाराने मरण पावतो. पण नलिनी त्याच्या प्रेमावर निष्ठा ठेवून एकाकी जीवन जगू लागते व श्रीधरचे अवगुण बाजूला सारून त्याला मोठे करण्याचा प्रयत्न करत राहते.

नलिनी व श्रीधर मधील परस्परसंबंधातून असे दिसून येते की, श्रीधर हा आत्मकेंद्री असतो. त्यामुळे तो स्वत:च्या स्वार्थासाठी नलिनीशी संबंध टिकवून असतो. पण नलिनी श्रीधरवर मनापासून प्रेम करत असते. म्हणून तिची श्रीधरच्या मृत्यूनंतरही त्याच्या प्रेमावरील निष्ठा कमी होत नाही. याचेच चित्रण लेखकाने परिणामकारकतेने येथे केलेले दिसते.

## सदानंद - मुरलीधर :-

मुरलीधर सदानंद व श्रीधरचा आत्येभाऊ असतो. श्रीधरच्या मृत्यूमुळे मुरलीधर श्रीधरच्या घरी आलेला असतो. त्यावेळी सदानंद व मुरलीधर भेट होते. श्रीधरने मुरलीधरच्या वेड्या आईचे विकृत दर्शन घडवणारे नाटक लिहिलेले असते. त्यामुळे श्रीधरला बराच पैसा व प्रसिध्दी मिळालेली असते. म्हणून श्रीधरच्या मालमत्तेतील वाटा मुरलीधरला हवा असतो. त्यासाठी तो नलिनीकडेही जावून येतो.

सदानंदला मुरलीधरचा स्वार्थ समजतो व सदानंद मुरलीधरवर चिडतो. पण श्रीधरमुळे मुरलीधरच्या भावना दुखावल्या गेलेल्या असतात. त्याचा बदल घेण्यासाठी तो वाटा मागत असतो. हे सर्व सदानंदला समजल्यावर मुरलीधरविषयीचा गैरसमज दू होतो. पण मुरलीधरला सदानंदचे बोलणे मनाला लागते. तो काहीही न घेता जायला निघतो. तेव्हा सदानंद त्याची माफी मागतो. तरी मुरलीधर थांबत नाही. जाता जाता श्रीधरच्या प्रतिमेला नमस्कार करतो ते पाहूण सदानंदला आश्चर्य वाटते. मुरलीधर इतकेच म्हणतो की, '' त्याचं शरीर जळालं. भलंबुरं त्याच्या शरीरासोबत गेलं. त्याचा आत्मा पवित्र होता. नतमस्तक झालोच असेन मी तर तो त्याच्या आत्म्यापढं ?''[११] ('शहामृग' पृ.३४)

यातून मुरलीधर व सदानंद मधील परस्परसंबंधामध्ये भावाचे नाते असले तरी त्यांच्यात प्रथम गैरसमज झालेला दिसतो. त्यामुळे त्यांच्यात तणाव निर्माण होतो. नंतर मात्र त्यांच्यातील गैरसमज दूर होऊन आपलेपणा निर्माण झालेला दिसतो. तसेच मुरलीधरचे वागणे विसंगत वाटत असले तरी माणुसकीला धरून आलेले दिसते. तर सदानंदला मुरलीधरविषयी वाटलेला अभिमान आदराची भावना आपुलकीची भावना ही स्वभाववैशिष्ट्ये स्वाभाविक अशीच लेखकाने परस्परसंबंधातून चित्रित केलेली दिसतात.

' शहामृग ' या कथेत एकूण चार पात्रे आलेली आहेत. त्यामध्ये आनंदराव -सुमती, आनंदराव-नीलम, आनंदराव-किरण, सुमती-किरण, नीलम-किरण यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

## आनंदराव-सुमती :-

आनंदराव आणि सुमती मध्ये पतीपत्नीचे नाते असते व त्यांच्यात वैचारिक पातळीवर देवाणघेवाणही होत असते त्यामुळे सुमती नवऱ्याला प्रत्येक चांगल्या कामात प्रोत्साहन देत असते. आनंदरावही तिचे म्हणणे ऐकत असतात. त्यांच्या घरातील कोणताही महत्त्वाचा निर्णय दोघे मिळून घेत असतात. त्यामुळे त्यांच्यात विश्वास टिकून असलेला दिसतो. मात्र आता आनंदराव पन्नाशीचे असलेले दिसतात. पण त्यांचा उत्साह कमी झालेला दिसत नाही व त्यांचे मनही वृधत्व स्वीकारायला तयार नसते आणि सुमती मात्र वृधत्वाकडे झुकलेली दिसते व ती आनंदरावाना शारीरिक सुख देण्यामध्ये

कमी पडू लागते. पण ही गोष्ट सुमतीच्या लक्षात येत नाही. म्हणूनच आनंदराव किरण सारख्या वेश्येच्या आहारी गेलेले दिसतात.

सुमती व आनंदराव यांच्यातील परस्परसंबंध, पती पत्नी मध्ये ज्याप्रमाणे आपलेपणाचे प्रेमाणे, विश्वासाचे नाते असते. त्याप्रमाणेच येथे लेखकाने चित्रित केले आहेत. पण शेवटी आनंदरावांनी सुमतीचा विश्वास तोडलेला दिसतो व त्यातून आनंदरावांची वासना, विश्वासघातकी वृत्ती लेखकाने परिणामकारकपणे चित्रित केलेली दिसते.

## आनंदराव - नीलम :-

आनंदराव व नीलम मध्ये वडील-मुलीचे नाते असते. नीलम बावीस वर्षाची असते. त्यामुळे ती वडिलांशी बरोबरीच्या नात्याने बोलत असते. शिवाय ती सायन्स शिकत असल्यामुळे तिला स्त्रीपुरूष संबंधाविषयी माहीत असते. त्यामुळेच ती आनंदरावांना काही आडपडदा न ठेवता वेश्येबद्दल विचारते, " बाबा, या बायांना कुठले कुठले भयंकर रोग जडलेले असतात ना ?"[१२] ('शहामृग' पृ.५६) असे विचारणारी नीलम वडीलांच्या समाजकार्याला सहकार्य करण्यासाठी एका वेश्येला घरात राहण्यास परवानगी देते. नंतर तिच्याशी मैत्री करते. शिवाय ती इतकी समजूतदार असते की तिला आपले वडील चूकीचा निर्णय घेतात हे पटत नाही म्हणून ती म्हणते, " बाबा, तुम्ही विचार करा, तुम्ही स्वत: ठरवा . . . तुम्ही किरणला कुठल्या परिस्थितीतून, कुठल्या वस्तीतून इथं आणलय. शी वॉज प्रास्टिट्यूड, आणि तिच्यावर छान कव्हरस्टोरी तयार करून तुम्ही समाजाला दाखवून दिलंय की अशा मुलीचं आम्ही पुनर्वसन करतोय .... आणि तुम्ही किरणला असं एकटं ठेवण्याचा निर्णय घेताय ? तिला नोकरी लावून द्या आणि मग एखाद्या होस्टेलवर ठेवा."[१३] ('शहामृग' पृ.७३)

यातून आनंदराव व नीलम मध्ये वडील आणि मुलगी मधील प्रेम आणि विश्वासापेक्षा अधिक मित्रत्त्वाचे नाते शोभणेंनी येथे चित्रित केले आहे. तसेच नीलमचा समजूतदारापणा, बोलण्यातील सडेतोड वृत्ती, मोकळेपणा, विचारातील प्रगल्भता तडजोड करण्याची वृत्ती ही स्वभाववैशिष्ट्ये त्यातून लेखकाने चित्रित केली आहेत.

## आनंदराव - किरण :-

आनंदराव एक समाजसेवक आहेत व किरण ही वेश्या आहे वेश्या पुनर्वसन कार्यामुळे या दोघांचा संबंध येतो. आनंदराव किरण पेक्षा तीस वर्षानी मोठे आहेत. तरीही किरणचे सौंदर्य पाहून आनंदरावांच्या वासना जागृत होतात आणि ते तिच्याशी संबंध ठेवू लागतात. किरणला आनंदरावांशी शारीरिक संबंध ठेवण्यात काहीही कमीपणा वाटत नाही. कारण तिला स्वत:च्या उदरनिर्वाहाची तरतूद करायची असते. पण आनंदरावांच्या हे लक्षात येत नाही. त्यांना सामाजिक बांधिलकी असते. कौटुंबिक जबाबदारीची जाणीव असते. तरीही ते फक्त नात्याने किरणकडे गेलेले दिसतात. किरणचे पुनर्वसन करण्याऐवजी आनंदराव स्वत:च तिच्या अडकत गेलेले दिसतात व त्या दोघात आदिम नात्यापलीकडे काहीही दिसत नाही.

यातून आनंदराव आणि किरण मधील कामवासनेचे चित्रण लेखकाने केलेले आहे. तसचे आनंदरावांची वासना, असंतुष्ट वृत्ती, भोगी वृत्ती व किरण मधील वेश्या आणि तिचा स्वार्थ ही स्वभाववैशिष्ट्ये सुध्दा त्यातून लेखकाने चित्रित केली आहेत.

## नीलम-किरण :-

नीलम ही समाजसेवकांची मुलगी असते. त्यामुळे वेश्या पुनर्वसनाच्या निमित्ताने किरण या वेश्येशी नीलमचा संबंध येतो. स्वाभाविकपणे त्यांच्या संस्कारात दोन टोकाचे अंतर दिसते. पण वेश्ये विषयी काही समजूती नीलमच्या मनात असतात. त्या किरणला जवळून पाहिल्यानंतर दूर होतात. त्यामुळे नीलम आपल्यापरीने तिचे पुनर्वसन होण्यासाठी प्रयत्न करते. तिच्यातील वाईट सवयी घालवण्याचा प्रयत्न करते. समाजात ज्या गोष्टी चांगल्या मानल्या जातात त्याचे ज्ञान तिला करून देते. त्यामुळे नीलम व किरण मध्ये मैत्रीचे संबंध निर्माण झालेले दिसतात.

नीलम व किरण यांच्या परस्पर संवंधातून मित्रत्त्वाचे व आपुलकीचे संबंध चित्रित होतात व नीलमचा प्रामाणिकपणा, निष्पाप वृत्ती, मदत करण्याची भावना, समजूतदारपणा, किरणची शिकण्याची

वृत्ती, जिद्द ही स्वभाववैशिष्ट्ये चित्रित केली आहेत. असे संबंध अपवादात्मक दिसत असले तरी ते वास्तव वाटते.

सारांश, ' न सापडलेले उत्तर ', ' आपुले मरणा ', ' इस शहर में हर शख्स .... ', 'महाप्रस्थान', ' शहामृग ' या सर्व कथातून स्त्री-पुरूष यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे. त्यात पती-पत्नी, मुलगा-आईवडील, मुलगी-आईवडील, प्रियकर-प्रेयसी अशा संबंधाव्यतिरिक्त विवाहबाह्य स्त्री-पुरूष संबंध आलेले आहेत व स्त्री-पुरूषसंबंधातील तणाव प्रेम, आपुलकी, स्वार्थीपणा, निष्ठा या वैशिष्ट्यांचे चित्रण शोभणेंच्या कथातून दिसून येते. मग त्यामध्ये आनंदराव-सुमती या पती-पत्नी मधील प्रेम, विश्वास तर वसंतराव-भावना मधील तणाव येतो. राजू-वसंतराव-भावना तसेच प्रभा-लिना या मुलगा- आईवडिल व मुलगी-आई यांच्यातील संबंधामधील तणाव तर आनंदराव-नीलम या वडिल-मुलगी यासंबंधातील खुलेपणा, मोकळेपणा चित्रित केला आहे. भाईजी-सुशीला, नलिनी-श्रीधर यांच्या विवाहबाह्य संबंधातील निष्ठा तर आनंदराव-किरण यांच्या संबंधातील वासनेचे चित्रण आले आहे व शैला-प्रभा, सुशीला-विभा यांच्यातील संबंधातून द्वेष, सूड या भावनांचे चित्रण आलेले आहे. यासर्व परस्परसंबंधातून आलेल्या पात्रामधील स्वार्थी, कपटी, त्यागी, भोगी, प्रेमळ, प्रामाणिक, व्यवहारीक, लालसी वृत्ती, मानसिक ताण, संघर्ष, तणाव, जिव्हाळ्याची भावना, परकेपणा, द्वेष, सूडाची भावना अशी अनेक स्वभाववैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

### ३. वृत्तपत्रीय जगतातील पात्रांचे परस्परसंबंध :-

' वर्तमान ' या कथासंग्रहातील 'हकनाक ' व ' सत्य ' या कथेतून वृत्तपत्रीय जगतातील पात्रांचे परस्परसंबंध आलेले आहेत.

' सत्य ' या कथेत एकूण दोन पात्रे आलेली आहेत. त्यामध्ये निरंजन काकडे-मिसेस भगत यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

## निरंजन काकडे - मिसेस भगत :-

निरंजन काकडे पत्रकार असतो. त्यामुळे तो रामदास भगतच्या अपघाताची बातमी छापतो. पण मिसेस भगतला नवऱ्याचा खून झाला असल्याची खात्री असते. म्हणून ती काकडेंच्याकडे न्याय मागण्यासाठी येते. ती काकडेला सर्व पुरावे देते. त्यामुळे निरंजन काकडेची रामदासच्या खुनाची खात्री पटते. मिसेस भगतची न्यायासाठी चाललेली खटपट व तिच्या मुलीचा केविलवाणा चेहरा बघून काकडेला दया येते तो भगतच्या खूनाचा पूर्ण तपास लावतो. त्यावेळी भगतच्या खूनामागे मोठ्या लोकांचे हात आहेत हे दिसून येते. तरीही काकडे मिसेस भगतला न्याय मिळवून देण्यासाठी बातमी छापणार असतो. पण काकडेला जीवे मारण्याची धमकी मिळाल्यानंतर ते बदलतात व शेवटी मिसेस भगतना न्याय मिळत नाही. सत्य हे असत्य बनून राहते.

यातून काकडे व मिसेस भगत मध्ये आपुलकीचे माणुसकीचे संबंध निर्माण झालेले दिसून येतात. तसेच काकडेंचा वेश्याशी प्रामाणिकपणा, मिसेस भगतना न्याय मिळवून देण्याची धडपड, सहानुभूतीची भावना, दयाळू स्वभाव व लाचारी वृत्ती तर मिसेस भगतची कणखर वृत्ती, जिद्द व निराशाची भावना ही स्वभाववैशिष्ट्ये त्यातून लेखकाने चित्रित केली आहेत.

' हकनाक ' या कथेत तीन पात्रे आलेली आहेत. त्यामध्ये प्रा. झाडगावकर - संपादक, प्रा. झाडगावकर-नवघरे यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

## प्रा. झाडगावकर - संपादक

प्रा. झाडगावकरांविषयी खोटीच बातमी वृत्तपत्रातून येते. त्यासाठी वे वृत्तपत्र विभागातील संपादकाकडे जातात व त्यांना बातमी कशी खोटी आहे याचे पुरावे देतात. त्यामुळे संपादकाला बातमीची माफी मागणे भाग पडते. ते पेपरातून माफी मागायला तयार होतात. पण बातमी छापली जात नाही म्हणून परत प्रा. झाडगावकरांना संपादकाकडे जाणे भाग पडते. यावेळी मात्र संपादक त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करतात; टाळण्याचा प्रयत्न करतात झाडगावकर बराच वेळ थांबल्यानंतर शेवटी नवघरे या वार्ताहरला बोलावून त्यांना त्यांचे काम करण्यास सांगतात.

प्रा. झाडगावकर व संपादक यांच्या परस्परसंबंधातून वृत्तपत्रीय माध्यमातील हलगर्जीपणा संपादकाकडून होणारा दुर्लक्षीपणा, निष्काळजीपणा त्यामुळे सामान्य व्यक्तिवर होणारा अन्याय, सामान्य जनतेला दिली जाणारी वागणूक, त्यामुळे त्रस्त झालेले प्रा. झाडगावकर याचे परिणामकारकपणे शोभणेंनी चित्रण केले आहे.

**प्रा. झाडगावकर - नवघरे**

नवघरे हा वार्ताहर असता त्यांना प्रा. झाडगावकरांच्या खोट्या छापलेल्या बातमीबद्दल पेपरातून माफी मागण्याचे काम दिलेले असते. नवघरे प्रा. झाडगावकरांना भेटतात तेव्हा त्यांच्याशी कुचेष्टेने बोलतात आणि माफीची बातमी शहरातल्या पेपरात न छापता खेड्यातल्या पेपरात छापतात. त्यांच्या अशा वागणुकीने प्रा. झाडगावकर त्रस्त झालेले दिसतात. तरीही ते परत बातमी विषयी नवघरेंकडे बोलायला जातात. नवघरे स्वत:ची चूक असूनही प्रा. झाडगावकरांशी उर्मटपणे बोलतात. त्यामुळे त्यांच्यात बातमी छापल्यावरून वादावादी होते व शेवटी त्रस्त झालेले प्रा. झाडगावकर कोर्टात जाण्याची धमकी देवून निघून जातात.

प्रा. झाडगावकर व नवघरे यांच्या परस्परसंबंधातून वृत्तपत्रीय जगतात किती अंदाधूंदी कारभार चालतो. नवघरे सारखा कर्मचारी सुध्दा किती बेजबाबदरपणे काम करतो व प्रा. झाडगावकरांसारख्या सामान्य माणसावर किती अन्याय होतो याचे चित्रण लेखकाने येथे नेमकेपणाने केलेले दिसते.

सारांश, 'सत्य', 'हकनाक' कथातून वृत्तपत्रीय जगतातील पात्रांचे परस्परसंबंधातून वृत्तपत्रीय जगतातील सत्यता कळते. तर सामान्य लोकांवर होणारा अन्याय कळून येतो. निरंजन काकडे भगत यांच्या परस्परसंबंधातून वृत्तपत्रीय जगताची सत्यता दिसते. तर प्रा. झाडगावकर-संपादक, प्रा. झाडगावकर-नवघरे यांच्यातील परस्परसंबंधातून हकनाक सामान्य लोकांवर वृत्तपत्रांमुळे होणारा अन्याय दिसतो. तर पात्रांच्या परस्परसंबंधातून कामचुकारणा, निष्काळजीपणा, प्रमाणिकपणा, दुर्लक्षीतपणा, भित्रेपणा, लाचारी वृत्ती अशी स्वभाववैशिष्ट्ये दिसून येतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## ४. सुधारणावादी पात्रांचे परस्पर संबंध -

' शहामृग ', या कथासंग्रहातील ' सती आणि महात्मा ' या कथेतून सुधारणावादी पात्रांचे परस्परसंबंध आलेले आहेत.

' सती आणि महात्मा ' या कथेत एकूण चार पात्रे आलेली आहेत. त्यामध्ये कल्याणी-नानी, कल्याणी-आई, कल्याणी-आचार्य यांच्यातील परस्परसंबंधाचे चित्रण आलेले आहे.

### कल्याणी - नानी :-

कल्याणी व नानी मध्ये दोन पिढ्यांचे अंतर असते. पण नानी स्वातंत्र्यपूर्वकाळातील सुधारंणावादासाठी लढणारी स्त्री असते. त्यामुळे कल्याणीला आपली आजी नानी खूप मोठी वाटत असते. कल्याणीनेही घरातील सुधारणावादाचा वारसा चालवण्याचा प्रयत्न केलेला असतो. पण कल्याणीला सुधारणावादाची योग्य दिशा मिळत नाही. त्यामुळे तिला मोठ्या दिव्यातून जावे लागलेले असते. तिला झालेल्या वेदनेची कल्पना नानीला असते. कल्याणीने समाजसुधारणेसाठी अडाणी भीमा मजुराशी लग्न केलेले असते व त्याचे केलेले शारीरिक, मानसिक अत्याचार सहन केलेले असतात. त्यामुळे नानीला वाईट वाटत असते. म्हणून नानी कल्याणीशी बोलताना संकोच बाळगत नाही. तिला स्वत:च्या जीवनातील चढउतार उघउपणे सांगते. त्यामुळे कल्याणीला आजीच्या जीवनातून बरेच काही शिकायला मिळते व कल्याणीला दु:खातून सावरण्यास मदत होते.

यातून कल्याणी व नानी मधील परस्परसंबंध आजी आणि नाती पेक्षा मित्रत्वाचे नाते अधिक जाणवते. नानीला कल्याणीची असणारी काळजी, कल्याणीला दु:खातून बाहेर काढण्याची धडपड आणि कल्याणीवर असलेले प्रेम याचेच चित्रण लेखकाने येथे जाणीवपूर्वक केलेले दिसते.

### कल्याणी-आई :-

कल्याणी शिकलेली असूनही भीमा या मजूराशी लग्न करते. हे आईला आवडत नाही. तरी ती गप्प बसते. कल्याणी भीमाचे घर सोडून पळून येते. तिच्यावर झालेले आत्याचार पाहूण तिची आई हळहळते. तिला सावरण्याचा प्रयत्न करते. पण कल्याणी जेव्हा भिमाचा गर्भ नाहीसा करायला निघते.

तेव्हा मात्र तिची आई चिडते. दोघीत मतभेद होतात. आई तिला गर्भपात करण्यास मनाई करते. मात्र कल्याणी ऐकत नाही. ती आईच्याच चूका दाखवू लागते. तेव्हा आई स्वत:च्या चूकीपेक्षा तिने केलेली चूक किती मोठी आहे याची जाणीव करून देते. कारण कल्याणी तिच्या आईच्या गर्भात लग्नाआधि आली असली तरी तिने लग्न करून तिला जन्म दिलेला असतो. त्यामुळे कल्याणीचे डोळे उघडतात. पण तिच्या जवळ गर्भपात करण्याशिवाय पर्याय नसतो.

कल्याणी आई मधील परस्परसंबंध सुरवातीला चांगले असलेले दिसतात. पण नंतर त्यांच्यात तणाव निर्माण झालेला दिसतो. तसेच आईचे कल्याणीवर असलेले प्रेम, वाटणारी काळजी, समजून घेण्याची वृत्ती तर कल्याणीचा अहंभाव पश्चाताप ही स्वभाववैशिष्ट्ये शोभणेंनी परिणामकारकपणे चित्रित केली आहेत.

**कल्याणी-आचार्य :-**

कल्याणी आचार्यांच्या सुधारणेतील कृतिशीलते विषयीच्या विचारांशी सहमत होते व सुधारणा घडवून आणण्यासाठी स्वत: अविचाराने भीमासारख्या अडाणी मजुराशी लग्न करते आणि आचार्य सुध्दा तिला प्रोत्साहन देतात. पण कल्याणीवर भीमा आत्याचार करतो. तेव्हा कल्याणी भीमाच्या घरातून पळून येते आणि झालेली सर्व हकीकत आचार्यांना सांगते. मात्र आचार्य उलट क ल्याणीलाच समजावण्याचा प्रयत्न करतात व भीमाची बाजू घेऊन त्याच्याकडे परत जाण्यास सांगतात. त्यामुळे कल्याणीचा आचार्यांवरील विश्वासच उडून जातो. तिला त्यांचे खरे रूप दिसायला लागते. त्यांना समाजसुधारणे पेक्षा, माणसापेक्षा कृतिशीलतेचा प्रयोग महत्वाचा वाटतो. म्हणून कल्याणी शेवटी आचार्यांच्या विरूध्द बंड करून उठते व भीमाचे आचार्यांना दुसरे लग्न करून देत नाही.

कल्याणी व आचार्य यांच्या परस्पर संबंधातून समाजसुधारणेतील बेगडीपणा दिसून येतो. आचार्यांना असलेला महात्मेपणाचा हव्यास व त्यामुळे निर्माण झालेला स्वार्थ आणि त्या स्वार्थापुढे बळी गेलेली कल्याणी आचार्यांचे खरे रूप दिसल्यानंतर त्यांच्या विरूध्द सामना करण्याची बंडखोर वृत्ती दिसून येते.

सारांश, ' सती आणि महात्मा ' या कथेतून सुधारणावादी पात्रांचे परस्परसंबंध चित्रित झालेले आहेत. कल्याणी-नानी, कल्याणी-आई यांच्या परस्परसंबंधातून प्रेमाचे, विश्वासाचे, मित्रत्वाचे तितकेच तणावाचे चित्रण आले आहे. तर कल्याणी-आचार्य यांच्या संबंधातून सुधारणावादातील बेडगीपणाचे चित्रण आले आहे. तसेच त्यांच्या परस्परसंबंधातून स्वार्थी प्रामाणिक, हेकेखोर, धाडसी, बंडखोरवृत्ती अशी स्वभाववैशिष्ट्ये दिसून येतात.

**समारोप :-**

शोभणेंच्या सर्व कथेतील पात्रे व पात्रांचे परस्परसंबंध पाहाताना असे दिसून येते की इतर कथेच्या घटका इतकेच पात्राचे स्थान महत्वाचे व अटळ असे आहे व पात्रांच्या परस्परसंबंधातून पात्रांचे स्वभाववैशिष्ट्येही दिसून आलीत. शोभणेंच्या कथासंग्रहातील कथेतील पात्रांचे परस्परसंबंध पाहाणे सोयीस्कर व्हावे म्हणून त्यांची विभागणी पात्रांच्या परस्पर संबंधानुसार केली आहे.

राजकीय क्षेत्रातील पात्रांचे परस्परसंबंध पहात असताना ' पायरीचा दगड ', ' जल्लोश', ' तेथ लव्हाळे राहती ', ' खेळीया ' या कथेतील पात्रांमधील परस्परसंबंध पाहिले. तसेच त्यातून अनेक स्वभाववैशिष्ट्ये आलेली पाहिली. त्यात सुधीर व बाळासाहेबांचा स्वार्थीपणा, कुरघोडी करण्याची प्रवृत्ती, भाऊंचा साधा सरळ विचार करण्याचा भाबडेपणा मृदुलाचा भोळेपणा, प्रभूचा हट्टीपणा, जिद्दीपणा तर प्राचार्यांचा स्वार्थीपणा व प्रा. काशीकरांचा समंजसपणा, सुदामदादांची नैतिकतेसाठी लढण्याची वृत्ती तर धैर्यधरची नीतीभ्रष्टता, शीलांचा भोळेपणा, प्रामाणिकपणा, विमलची साधी सरळ वागण्याची सवय तर मालविकाची सत्तेची लालसा व सत्तेत पुढे येण्याची जिद्द तर शेखरचा प्रेमळपणा, माईसाहेबांची खलप्रवृत्ती तर शिरूभाऊंची द्वेषाची भावना व हताशपणा अशा प्रत्येक व्यक्ती मध्ये वेगवेगळ्या भावना, वृत्ती, प्रवृत्ती आणि स्वभाव दिसून येतात. तसेच प्रत्येक पात्रांच्या परस्परसंबंधातून वेगवेगळेपण जाणवते. काही पात्रांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध दिसून येतात. तर काही संबंधामध्ये द्वेषाची भावना असलेली दिसते व काही संबंधामध्ये लढा सुरू असलेला दिसतो. तर काही संबंध परस्परविरोधी भूमिकेतून लढताना दिसतात. अशा अनेक पात्रांच्या परस्परसंबंधातून शोभणेंनी परस्परविरोधी स्वभावाच्या व्यक्तिरेखांची निर्मिती केलेली दिसते व या व्यक्तिरेखांमुळे कथानकाला एकप्रकारे

जिवंतपणा आणलेला दिसतो. राजकीय जीवनात असलेला संघर्ष, खेळी, स्वार्थ, भ्रष्टाचार, कुरघोडी ही सर्व वैशिष्ट्ये पात्रांच्या परस्परसंबंधातून चित्रित केलेली आहेत.

‘ न सापडलेले उत्तर ’, ‘ आपुले मरण ’, ‘ इस शहर में हर शख्स ... ’, ‘ महाप्रस्थान ’, ‘शहामृग’ या कथातून स्त्री-पुरूष यांच्यातील परस्पर संबंधाचे चित्रण आलेले आहे. त्यात पती-पत्नी, मुलगा-आई-वडिल, मुलगी-आई, मुलगी-वडिल, प्रियकर-प्रेयसी अशा संबंधा व्यतिरिक्त विवाहबाह्य स्त्री-पुरूष संबंध आलेले आहेत व स्त्री-पुरूष संबंधातील तणाव, प्रेम आपुलकी, स्वार्थीपणा, निष्ठा या सर्वांचे चित्रण शोभणेंच्या कथातून दिसून येते. मग त्यामध्ये आनंदराव-सुमती या पती-पत्नीमधील प्रेम, विश्वास तर वसंतराव-भावना मधील तणाव येतो. राजू वसंतराव आणि भावना तसेच प्रभा-लिना या आई-वडिल-मुलगा किंवा मुलगी यांच्यात संबंधातील तणाव तर आनंदराव-नीलम या वडिल-मुलगी या संबंधातील खुलेपणा चित्रित केला आहे. भाईजी-सुशीला, नलिनी-श्रीधर यांच्या विवाहबाह्य संबंधातील निष्ठा दाखवली आहे. तर आनंदराव-किरण यांच्या संबंधातील वासनेचे चित्रण आले आहे व शैला-प्रभा सुशीला-विभा यांच्यातील संबंधातून द्वेष, सूड या भावनांचे चित्रण आलेले आहे. या सर्व परस्पर संबंधातून आलेल्या पात्रामधील स्वार्थी, कपटी, त्यागी, भोगी, प्रेमळ प्रामाणिक, व्यवहारिक लालसी वृत्ती, मानसिक ताण, संघर्ष, तणाव, जिव्हाळ्याची भावना, परकेपणा, द्वेष, सूडाची भावना अशी अनेक स्वभावाची वैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

‘ सत्य ’, ‘ हकनाक ’ कथातून वृत्तपत्रीय जगतातील पात्रांचे परस्परसंबंधातून वृत्तपत्रीय जगतातील सत्यता कळते. तर सामान्य लोकांवर होणारा अन्याय कळून येतो. निरंजन काकडे-मिसेस भगत यांच्या परस्परसंबंधातून वृत्तपत्रीय जगताची सत्यता दिसते. तर प्रा. झाडगावकर - संपादक, प्रा.झाडगावकर-नवघरे यांच्यातील परस्परसंबंधातून हकनाक सामान्य लोकांवर वृत्तपत्रांमुळे होणारा अन्याय दिसतो. तर पात्राच्या परस्परसंबंधातून कामचुकारपणा निष्कळाजीपणा, प्रमाणिकपणा, दुर्लक्षीपणा, भित्रेपणा, लाचारी वृत्ती अशी स्वभाववैशिष्ट्येही दिसून येतात.

‘ सती आणि महात्मा ’ या कथेतून सुधारणावादी पात्रांचे परस्परसंबंध, चित्रित झालेले आहोत. कल्याणी-नानी, कल्याणी-आई यांच्या परस्परसंबंधातून मित्रत्वाचे चित्रण येते. तर कल्याणी-आचार्य

यांच्या परस्परसंबंधामध्ये तणाव निर्माण झालेला दिसतो. तसेच या परस्परसंबंधातून स्वार्थी, प्रामाणिक, हेकेखोर, धाडसी, बंडखोर वृत्ती अशी स्वभाववैशिष्ट्ये दिसून येतात.

अशा प्रकारे ' वर्तमान ' व ' शहामृग ' या कथासंग्रहातील कथेतील पात्रांचे परस्पर संबंध आलेले दिसतात व परस्परसंबंधातून स्वभाववैशिष्ट्ये दिसून येतात. कथेतील पात्रांचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे समजून येते व शोभणेंनी निर्माण केलेली सर्व पात्रे संघर्षयुक्त आहेत हे कळून येते आणि संघर्षयुक्त पात्रामुळे कथानकाला गती मिळत असते. त्यामुळे शोभणेंच्या पात्रांमुहे कथेला गती निर्माण झाली हे लक्षात आल्यावाचून रहात नाही. तसेच कथेतील पात्रांमध्ये राजकीय वृत्तपत्रीय समाजसुधारणा अशा विविध क्षेत्रातील पुरूष व स्त्री पात्रे आलेली दिसतात आणि त्या पात्रांच्या स्वभावामध्ये सुध्दा विविधता जाणवते.

राजकीय क्षेत्रातील पात्रांच्या परस्परसंबंधात काही पुरूष पात्रांच्या स्वभावामध्ये स्वार्थीपणा, नीतीभ्रष्टता, हट्टीपणा, जिद्दीपणा, कुरघोडी करण्याची वृत्ती तर काही पात्रे साधी, सरळ, प्रामाणिक, भाबडी, नैतिकतेसाठी लढणारी स्वाभीमानी दिसून येतात. वृत्तपत्रीय क्षेत्रातील काही पात्रांच्या स्वभावामध्ये कामचुकारपणा निष्काळजीपणा, दुर्लक्षीपणा तर काही पात्रांत प्रामाणिकपणा, भित्रेपणा, लाचारी वृत्ती दिसून येते. तसेच समाजसुधारणेच्या क्षेत्रातील पुरूष पात्रांमध्ये स्वार्थीपणा, अधिक दिसून येतो. प्रत्येक क्षेत्रानुसार पुरूष पात्राच्या स्वभावात बदल झालेला दिसतो. त्यामुळे पात्रांच्या स्वभावात विविधता जाणवते.

कथेतील पात्रांच्या परस्परसंबंधातून स्त्री पात्रांच्या स्वभावात सुध्दा वेगळेपणा जाणवते. राजकीय क्षेत्रातील स्त्रीपात्रेही सत्तेची लालसा असलेली जिद्दी, खल प्रवृत्तीची दिसून येतात. त्याच प्रमाणे काही स्त्री पात्रे ही भोळी, साधी, सरळ, प्रामाणिक स्वभावाची सुध्दा दिसून येतात. तर समाजसुधारणेच्या क्षेत्रातील स्त्री पात्रे तितकीच धाडसी, बंडखोर स्वभावाची दिसून येतात.

स्त्री-पुरूषातील नातेसंबंधा मध्ये पती-पत्नी, मुलगा-आईवडील, मुलगी-आई, मुलगी-वडील, प्रियकर-प्रेयसी अशा संबंधा व्यतिरिक्त विवाहबाह्य स्त्री-पुरूष नातेसंबंध आलेले दिसतात.

शोभणेंनी आपल्या कथेतील पात्रांच्या परस्परसंबंधातून राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहार व त्या भ्रष्ट व्यवहाराला सरावत चाललेली माणसे, भ्रष्ट व्यवहाराने उद्ध्वस्त झालेली माणसे याचे चित्रण केले आहे आणि वृत्तपत्रीय जगतातील चाललेला अंदाधुंदी कारभार व त्यामुळे लोकांचा वृत्तपत्रावरील उडत चाललेला विश्वास तसेच समाजसुधारेच्या नावाखाली लपून राहिलेला स्वार्थ आणि त्यात नि:स्वार्थी भावाने भरडली जाणारी माणसे. त्याच प्रमाणे वेगवेगळ्या स्वरूपात स्त्री-पुरूष नातेसंबंधामध्ये वाढत चाललेला तणाव याचेच चित्रण शोभणेंनी जाणीवपूर्वक या प्रकरणातील पात्रांच्या परस्परसंबंधातून केलेले दिसते.

प्रस्तुत प्रकरणात कथेतील पात्रांचे परस्परसंबंध पाहिल्यानंतर पुढील प्रकरणात ' वर्तमान ' आणि ' शहामृग ' या कथासंग्रहातील कथेतील भाषा आणि निवेदन या घटकांचा अभ्यास करावयाचा आहे.